महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ 11 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 227 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे

## निळजे रेल्वे पुलाचे काम पूर्ण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : निळजे रेल्वे पुलाच्या पुनर्बांधणीचे अवजड काम विहित वेळेच्या एक दिवस अगोदरच पूर्ण झाले. पुलाची लहान, किरकोळ स्थापत्य कामे आता पूर्ण केली जात आहेत. ही कामे आता पुलाखालील किरकोळ कामे असल्याने वाहतुकीचा या कामांशी संबंध नाही. त्यामुळे पुलावरील वाहतूक सोमवारी रात्री १२ वाजल्यानंतर आता नियमित सुरू होऊ शकेल, असे रेल्वेच्या अभियंत्याने सांगितले.तर, रेल्वेची कामे पाहून याबाबतचा अंतीम निर्णय घेतला जाईल, असे एका वाहतूक अधिकाऱ्याने सांगितले. शिळफाटा रस्ता मागील पाच दिवसांपासून निळजे रेल्वे उड्डाण पुलाच्या पुनर्बांधणीच्या कामासाठी बंद आहे. या रस्त्यावरून फक्त हलकी वाहने धावतात.

सहा चाकी जड, १२, २४ चाकी अवजड वाहनांना या रस्त्यावरून बंदी आहे. मालवाहू अवजड वाहतूक मागील पाच दिवसांपासून खोणी नाका, शिळफाटा कल्याण फाटा मुंब्रा, खारेगावमार्गे, नेवाळीमार्गे सोडली जात आहे.निळजे रेल्वे पुलासाठी खोदकाम, खोदकाम केलेल्या खाच्यामध्ये तयार १९ सीमेंट कॉंक्रीटच्या भक्कम चौकटी बसविण्याचे काम पाच दिवसांच्या कालावधीत करण्यात आले. पुलाच्या खाच्यामध्ये चौकटी बसविण्याचे आव्हानात्मक मागील तीन ते चार दिवसांमध्ये दिवस, रात्र करण्यात आले. आता १९ चौकटींमध्ये कॉंक्रीट टाकून त्या बंदिस्त करणे, पुलाखालील चारही बाजुचा भाग बंदिस्त करून घेण्याचे काम सुरू आहे. शिळफाटा रस्ता पाच दिवस बंद राहणार असल्याने या रस्त्यावरील कोंडीच्या भीतीने अनेक प्रवाशांनी पयार्यी रस्ते मार्गाने प्रवास करणे पसंत केले. तर काही प्रवाशांनी कोंडीत अडकून तासन तासन एकाच जागी अडकून पडण्यापेक्षा घरातून कार्यालयीन काम करणे पसंत केले. शिळफाटा रस्त्यावरील पलावा चौकाकडे जाणारी वाहतूक लगतच्या पलावा चौक, लोढा, निळजे, काटई, खिडकाळी रहिवाशांसाठी खुली ठेवण्यात आली होती. या रस्त्यावरून बाहेरची हलकी वाहने धावत होती.

काही हलकी वाहने निळजे पुलावर कोंडी होऊ नये म्हणून काटई चौक खोणी तळोजा मार्गे सोडण्यात येत होती. काही वाहन चालकांनी माणकोली पूलमार्गे, गोविंदवाडी, दुर्गाडी कोनमार्गे इच्छित स्थळी जाण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शिळफाटा रस्त्यावरील वाहन भार मागील पाच दिवस कमी प्रमाणात होता.या रस्त्यावरील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी १५० वाहतूक पोलीस, कर्मचाऱ्यांचा ताफा तैनात करण्यात आला आहे. शिळफाटा रस्ता मंगळवारपासून पुन्हा वाहतुकीसाठी सुरळीत सुरू होण्याच्या प्रतीक्षेत प्रवासी आहेत.

## गोवेलीची जिल्हा बँक नवीन इमारतीत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण तालुक्यातील गोवेली येथील ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँके चे स्थलांतर नवीन इमारतीत करण्यात आले. यावेळी बँकेचे आध्यक्ष राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष अरुण पाटील व सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील सेवा शेतकरी सोसायटी चे आध्यक्ष व सदस्य, सरपंच, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आध्यक्ष राजेंद्र पाटील, अरुण पाटील, बँकेचे व्यवस्थापक गोंधळी यांनी बँकेच्या कारभाराविषयीं माहिती दिली.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज ठाकरे यांची भेट



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाल्याने राजकीय वर्तुळात वेगवेगळया चर्चांना उधाण आल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान या भेटीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भेटीमागचं कारण सांगितलं आहे. ही भेट राजकीय नव्हती असं फडणवीस म्हणाले आहेत. राज ठाकरे यांची भेट घेतल्याबद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "ही कुठलीही राजकीय भेट नाही, मी मुख्यमंत्री झाल्यानंतर राज ठाकरे यांचा अभिनंदनाचा फोन आला, तेव्हा मी त्यांना सांगितलं होतं की मी घरी येईन, त्याप्रमाणे मी घरी गेलो होते. ब्रेकफास्ट केला गप्पा मारल्या. या बैठकीचा कुठलाही राजकीय संदर्भ नाही. केवळ मैत्रीकरिता मी त्यांच्या घरी गेलो होते."

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि महायुतीचा ऐतिहासिक विजय झाला. या विजयावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संशय व्यक्त केला होता. त्यानतंर मनसे-महायुतीच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण सुरू झाले. यादरम्यान आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी आज शिवतीर्थावर जाऊन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात वेगवेगळया चर्चा सुरू झाल्या होत्या. या दोन प्रमुख नेत्यांची सुमारे तासभर तरी बंद दाराआड चर्चा झाली.

मुख्यमंत्री झाल्यानंतर फडणवीसांची भेट झाली नव्हती. आजची भेट ही सदिच्छा भेट होती, यामध्ये राजकीय असं काही नव्हतं, अशी प्रतिक्रिया मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींबद्दल काही चर्चा झाली का? या बद्दल विचारले असता देशपांडे म्हणाले की, आज काय बोलणं झालं याची मला कल्पना नाही. आजची भेट राजकीय नव्हती सदिच्छा भेट होती. राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांचे जुने संबंध आहेत. दोन्ही नेत्यांच्या राजकीय भूमिका वेगळ्या असू शकतात पण राजकारण्यांचे वैयक्तिक संबंध असतात, असेही संदीप देशपांडे म्हणाले.

# आत्मविश्वासाने परीक्षेला बसा



## - उपमुख्यमंत्र्यांचे बारावीच्या विद्यार्थ्यांना पत्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शिक्षण हा सर्वात मोठा आधारस्तंभ आहे. आगामी परीक्षांच्या काळात तुम्ही निर्धास्त, आत्मविश्वासाने आणि प्रामाणिकपणे परीक्षेस सामोरे जावे, यासाठी जिल्हा प्रशासन आपल्यासोबत आहे. " भयमुक्त कॉपीमुक्त परीक्षा " या संकल्पनेला बळ देण्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घ्यावा. असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी यंदा दहावी आणि बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना केले आहे.

संपूर्ण राज्यभरात दहावी आणि बारावीच्या परीक्षेचे वातावरण आहे. सर्व विद्यार्थ्यांकडून परीक्षेची जोरदार तयारी सुरू आहे. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये काही अंशी परीक्षेबाबत भीती दिसून येत असते. याच पार्श्वभूमीवर परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांचे स्वागत करणे, परीक्षेसाठी शुभेच्छा देणे यांसह परीक्षा केंद्राबाबत रीतसर माहिती देणे यांसारख्या अनेक उपक्रम स्थानिक शाळांकडून राबविण्यात येतात. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी भयमुक्त राहून परीक्षा द्यावेत यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी यंदा दहावी आणि बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना पत्र लिहले आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शिक्षण हा सर्वात मोठा आधारस्तंभ आहे. आगामी परीक्षांच्या काळात तुम्ही निर्धास्त, आत्मविश्वासाने आणि प्रामाणिकपणे परीक्षेस सामोरे जावे, यासाठी जिल्हा प्रशासन आपल्यासोबत आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांना पाठवलेल्या संदेशात नमूद केल्याप्रमाणे, राज्यभरात कॉपी रोखण्यासाठी आणि परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी प्रशासन विविध उपाययोजना राबवत असल्याचे एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे.**

**परीक्षेदरम्यान होणारी फसवणूक रोखण्यासाठी, परीक्षा केंद्रांच्या ५०० मीटरच्या परिघात असलेली फोटोकॉपी केंद्रे बंद राहतील आणि केंद्रांभोवती फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १४४ लागू केले जाईल, असे त्यात म्हटले आहे.**

**परीक्षा केंद्रातील कर्मचाऱ्यांची ओळख पडताळण्यासाठी चेहऱ्यावरील ओळख प्रणाली वापरली जाईल, ज्यामध्ये केंद्र नियंत्रक, पर्यवेक्षक आणि परीक्षा प्रक्रियेत सहभागी असलेल्या इतर कर्मचाऱ्यांचा समावेश असेल.**

भयमुक्त कॉपीमुक्त परीक्षा या संकल्पनेला बळ देण्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घ्यावा. शिक्षण हे केवळ गुणांसाठी नसून, ते तुमच्या ज्ञानवृध्दी आणि जीवन घडविण्याचे साधन आहे. समाजाच्या उज्वल भविष्यासाठी माझी सर्व विद्यार्थ्यांना विनंती आहे की, स्वतःच्या मेहनतीवर विश्वास ठेवा आणि प्रामाणिक प्रयत्नांमधून यश संपादन करा. विद्यार्थ्यांना सकारात्मक वातावरण मिळावे तसेच त्यांच्यात आत्मविश्वास वाढेल यासाठी पालक व शिक्षकांनी मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांची मानसिक तयारी करावी, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या पत्रात लिहले आहे. तसेच आगामी परीक्षा काळात कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रे भयमुक्त व कॉपीमुक्त राहतील, यासाठी जिल्हा प्रशासन सर्वतोपरी कटीबध्द आहे. परीक्षांच्या धर्तीवर राज्यामध्ये कॉपी प्रकरणास पुर्णतः प्रतिबंध करण्यासाठी व विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त आणि पारदर्शक परीक्षा प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासनाद्वारे विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. महाराष्ट्राची अस्मिता जोपासण्यासाठी आपण सर्वजण मिळून प्रामाणिकपणे आणि न्याय्य मार्गाने शिक्षणाला पुढे नेऊयात, असे ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या पत्रात म्हंटले आहे.

# शहापुरात भात खरेदीत बारदान घोटाळा ?

## आदिवासी विकास विभाग पुन्हा संशयाच्या फेऱ्यात




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : मागील काही वर्षापासून महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या शहापूर उपप्रादेशिक कार्यालयात केल्या गेलेल्या भात खरेदीत शासनाच्या या धोरणांना तिलांजली दिली आहे.मागील तीन वर्षात व्यापारी,महामंडळाचे अधिकारी-कर्मचारी, सायबर केंद्रवाले आणि आदिवासी संस्थांचे सचिव या कंपूने भातखरेदी करताना करोडोंचा अपहार केला आणि शासनाची फसवणूक केली आहे.दरम्यान लाखो रुपयांच्या बारदान घोटाळयात उपप्रादेशिक अधिकारी सागर सोनावणे व प्रादेशिक अधिकारी यांच्यावर देखील फौजदारी गुन्हे दाखल व्हावेत या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अपर्णा खाडे यांनी शहापूर येथील शिवातीर्थावर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.या संदर्भातील निवेदन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे व आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांना तहसीलदार परमेश्वर कासुले यांच्या मार्फत डॉ. खाडे यांनी दिले आहे.

भात खरेदी व बारदान वाटपात अधिकाऱ्यानीच नव्हे तर लोकप्रतिनिधींनी देखील लोकसेवक या नात्याने दखल घेणे क्रमप्राप्त आहे. शासनाने आधारभूत किंमत योजना शेतकऱ्यांच्या मालाला योग्य वेळेत रास्त भाव मिळावा, त्याची व्यापाऱ्याकडून लूट होऊ नये याकरिता सुरु केली.आदिवासी विकास महामंडळाच्या वतीने या योजनेची अंमलबजावणी केली जाते. मात्र गेल्या काही वर्षापासून आदिवासी महामंडळाच्या शहापूर उपप्रादेशिक कार्यालयात केल्या गेलेल्या भात खरेदीत शासनाच्या या धोरणांना तिलांजली दिली आहे. मागील तीन वर्षात व्यापारी, अधिकारी, महामंडळाचे कर्मचारी आणि आदिवासी संस्थांचे सचिव या चिंधी चोरांनी भातखरेदी करताना करोडोंचा अपहार केला आणि शासनाची फसवणूक केली आहे. जागरूक नागरिक आणि प्रसिद्धी माध्यमांनी यासंदर्भात आवाज उठविल्यानंतर व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांनी निर्भीड चौकशी करून गुन्हे नोंदवले परंतु सर्व प्रकरणात एखाद दुसरा आरोपी वगळता अनेकांना एक दोन वर्ष कालावधी उलटूनही अद्यापपर्यंत अटक झालेली नाही. हे सर्व आरोपी मोकाट फिरत असून शासनाच्या कोट्यावधी रुपयांची फसवणूक झाल्यानंतर त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची वसुली अद्याप का झाली नाही असा प्रश्न डॉ. खाडे यांनी उपस्थित केला आहे.सन २०१६/२०१७ या आर्थिक वर्षात मढ,अबर्जे आदिवासी संस्थेच्या प्रकरणातील आरोपीला सचिव यास पुन्हा खर्डी,पळशीन केंद्रावर नेमणूक देणाऱ्या अधिकाऱ्याची कसून चौकशी व्हावी. तसेच भात खरेदी करताना काही व्यापा-यांनी तलाठी आणि सायबर केंद्र संचालकांच्या मदतीने शेतकऱ्याऱ्यांचे बोगस सातबारे बनवले आहेत. तसेच सातबारा वरील विना लागावडी खालील क्षेत्र लागावडीच्या खोट्या नोंदी केल्या असल्याचे म्हटले आहे. अशा सर्व सात बाऱ्यांची चौकशी करून संबंधित व्यापारी, तलाठी आणि सायबरवाले यांच्यावर कारवाई करणे अनेक शेतकऱ्यांना महामंडळाने पावत्या दिलेले आहेत परंतु त्यांना अद्यापपर्यंत त्यांनी महामंडळात विकलेल्या भाताचा मोबदला मिळाला नाही. या सर्व प्रकरणास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी डॉ. अपर्णा खाडे यांनी केली आहे.



### काय आहेत मागण्या

बारदान घोटाळा प्रकरणी सर्व दोषींवर गुन्हे दाखल करणे, बारदान घोटाळा प्रकरणी अन्य केंद्रात आढळलेल्या तफावतीनुसार गुन्हे दाखल करणे, भात खरेदी घोटाळ्यातील आरोपीना अटक करून अपहार केलेल्या रकमेची वसुली करणे,अनेक शेतकऱ्यांना खरेदी केंद्रांवर भात खरेदीच्या पावत्या देऊनही अद्याप मोबदला मिळाला नसल्याने त्याना मोबदला मिळावा,दहा-बारा वर्षापासून वापरण्यात आलेल्या खाजगी गोदामधारकांना भाडे मिळणेबाबत,अपहार करणाऱ्या व्यक्तींना वारंवार सेवेत घेतल्याप्रकरणी चौकशी होणे, मागील तीन वर्षातील भात खरेदी करताना वापरलेल्या सातबा-यांची चौकशी करून याप्रकरणी दोषी व्यापारी, शेतकरी, तुलाठी, सायबर चालक यांच्यावर गुन्हे दाखल करणे,भात खरेदी आणि बारदान घोटाळ्याचे फॉरेन्सिक ऑडिट व्हावे,सहकारी सोसायट्याचे भात खरेदीचे कमिशन द्यावे व शेतकऱ्यांच्या बँक खात्यांची चौकशी व्हावी.

"शासनाच्या भात खरेदी योजना शेतकऱ्यांसाठी खूप चांगली योजना आहे.मात्र भ्रष्ट अधिकारी व कर्मचारी यांनी या योजनेला गाळबोट लावले आहे.या भात खरेदीत व बारदानामध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाला असून काहींवर गुन्हे देखील दसखल झाले आहेत.तसेच बारादान घोटाळयात उपाप्रादेशिक व्यवस्थापक सागर सोनावणे तसेच प्रादेशिक व्यवस्थापक यांचा देखील हात असल्याने त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहीजे.

● डॉ. अपर्णा खाडे, सामाजिक कार्यकर्त्या.




## खोदकामात खदानी नियमांचे उल्लंघन

# बोईसर परिसरात बेसुमार उत्खनन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : बोईसर पूर्व परिसरात दगड खदानीत मोठ्या प्रमाणात बेकायदा उत्खनन होत आहे. अनेक खदानी २०० फूटपेक्षा अधिक खोलीवर गेल्या आहेत. खदानींमध्ये साचलेल्या पाण्याचा उपसा करून फेकले जात असल्याने परिसरातील गावांमध्ये पाणीटंचाईची निर्माण झाली आहे. लालोंडे, नागझरी, गुंदले, निहे या भागांमध्ये हे उत्खनन होत आहे. बेसुमार दगड उत्खनन होत आहे.

उत्खनन करताना सहा मीटर लांबी व उंचीच्या पायऱ्या करत उतार करणे अपेक्षित असताना हा व इतर नियम धाब्यावर बसून २०० ते २५० फूट खोलीपर्यंत सरळ खोल खदानी करण्यात आल्या आहेत. जमिनीच्या पृष्ठभागावरून खोदकाम करणारे पोकलँड अथवा दगड वाहणारे डंपर यांना खदानींमधून



जमिनीवर पोहोचण्यासाठी २० ते २२ मिनिटांचा अवधी लागत आहे. अनेक खदानी लोकवस्तीपासून १५०-२०० फूट अंतरावर असून स्फोटामुळे घरांना हादरा बसत आहे. यासंदर्भात ग्रामस्थ तसेच ग्रामपंचायतीने अनेकदा तक्रारी केल्या आहेत, परंतु कोणतीही कारवाई झालेली नाही. विशेष म्हणजे पालकमंत्री यांनी आयोजित केलेल्या जनता दरबारांमध्ये यासंदर्भात दाखल केलेल्या तक्रारींनाही केराची टोपली दाखवण्यात आली आहे. दुसरीकडे तक्रार करणाऱ्यांविरुद्ध बेकायदा उत्खनन करणाऱ्यांकडून होणाऱ्या दमदाटीने त्रस्त झाले आहेत. खदानीत साचून राहत असलेल्या पाण्यावर परिसरातील विहिरी व कूपनलिका यांच्या पाण्याची पातळी अवलंबून आहे. दगड उत्खनन हंगाम सुरू झाल्यानंतर खदानीमध्ये साचलेले पाणी डोंगराच्या पूर्वेच्या बाजूला किराट गावाच्या बाजूने विविध शेतांमध्ये सोडण्यात येते. त्यामुळे शेती, बागायतीचे नुकसान होते. लगतच्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावू लागली आहे.

**लालोंडे, नागझरी व परिसरात असणाऱ्या खदानीबाबत तक्रारी प्राप्त आहेत. ड्रोनच्या साहाय्याने तात्रिक पद्धतीने या ठिकाणी असणाऱ्या खदानींचे मोजमाप करण्यात आले आहे. संबंधित खाणपट्टेधारक यांच्याकडून त्यांच्याकडे असणाऱ्या गौण खनिज शुल्क भरल्याचा तपशील मागवण्यात आला आहे. त्यामध्ये तफावत आढळल्यास संबंधितांकडून अतिरिक्त रॉयल्टी भरून घेण्यात येईल. नियमांचे उल्लंघन झाले असल्यास कारवाई करण्यात येईल.**

**-संदीप पाटील, जिल्हा जिल्हा खनिकर्म अधिकारी.**

## गीतासार



कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥२- ४७॥

तुला कर्म करण्याचाच अधिकार आहे. त्यांच्या फळाविषयी कधीही नाही. म्हणून तू कर्मांच्या फळांची इच्छा करणारा होऊ नकोस. तसेच कर्म न करण्याचाही आग्रह धरू नकोस. ॥ २-४७ ॥

योगस्थः कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनंजय ।
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥२- ४८॥

हे धनंजय अर्जुना, तू आसक्ती सोडून तसेच सिद्धी आणि असिद्धी यामध्ये समान भाव ठेवून योगात स्थिर होऊन कर्तव्य कर्मे कर. समत्वालाच योग म्हटले जाते. ॥ २-४८ ॥

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥२- ४९॥

या समत्वरूप बुद्धियोगापेक्षा सकाम कर्म अत्यंत तुच्छ आहे. म्हणून हे धनंजय अर्जुना, तू समबुद्धीतच रक्षणाचा उपाय शोध म्हणजे बुद्धियोगाचा आश्रय घे. कारण फळाची इच्छा बाळगणारे अत्यंत दीन असतात. ॥ २-४९ ॥

### किचन टिप्स

## महिलांसाठी अत्यंत फायदेशीर



तिळ आरोगरासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. तिळमध्ये अनेक प्रकारचे पोषक घटक असतात. हिवाळयात तिळाचे उपयोग जास्त केले जाते. तिळाचे लाडू, पापड्या असे अनेक प्रकार केले जातात. तिळात कॅल्शियम, लोह, पोटॅशियम, व्हिटॅमिन ए, सी आणि सोडियम असे अनेक पोषक घाटात असतात. यांच्या मदतीने महिलांच्या अनेक प्रकारच्या समस्यांपासून सुटकारा मिळवता येते.

**हाडे मजबूत होतात:**
तिळात कॅल्शियम भरपूर प्रमाणात आढळते. हाडांना मजबूत ठेवण्यासाठी कॅल्शियम अत्यंत गरजेचे असते. त्यामुळे तिळाचे नियमित स्वरूपात सेवन केल्याने हाडांच्या समस्या दूर होऊ शकतात.

**अनियमित मासिक पाळी:**
आजकालच्या व्यस्त जीवनशैली आणि तणावामुळे बऱ्याच महिलांना मासिक पाळीच्या समस्या उद्भवतात. मासिक पाळीतील अनियमितता ही खूप मोठी समस्या आहे. तिळातील फॅटी ऍसिड मात्र या समस्येवर मात करण्यात सक्षम ठरू शकते.

**हार्मोन्स संतुलित ठेवते:**
तिळामध्ये व्हिटॅमिन सी आढळतो ज्यामुळे शरीरात इस्ट्रोजेन हार्मोनची पातळी वाढते. तिळात अनेक प्रकारचे अँटिऑक्सिडेंट्स आणि अँटीबॅक्टेरिअल गुणधर्म असते. ज्यामुळे हार्मोन संतुलित ठेवण्यात भरपूर मदत मिळते.

**त्वचेसाठी:**
तिळाचे तेल त्वचेसाठी भरपूर फायदेशीर ठरते. तवचेल आवश्यक पोषण देऊन त्वचेतील आर्द्रता टिकून ठेवण्यात तिळाचे तेल मदत करते. तसेच ओठांवर तिळाचे तेल लावल्याने ओठांना मऊ आणि स्वस्थ ठेवण्यात मदत मिळते.

**एनर्जी वाढवते:**
दिवसभर सतत काम करत राहिल्याने महिलांना लवकरच थकवा जाणवतो. शरीरात ऊर्जेची कमतरता होते. अशा परिस्थितीत तिळाच्या नियमित सेवनाने ऊर्जा टिकून ठेवण्यात मदत होते. तिळात आढळणारे ओमेगा ३ यासाठी मददगार ठरते.

# डे'ज मुळे संस्कृती आणि मूल्यांशी दुरावा

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरा करण्याचे त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोज डे पासून सुरू झालेला हा डेज चा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, प्रॉमिस डे, टेडी डे, चॉकलेट डे, हग डे, किस डे असे विविध प्रकारचे डे येतात. डेज चा हा महोत्सव आठवडाभर चालतो. तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात कारण याच वयात मनी प्रेम फुलत असते. आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीला गुलाबाचे फुल देऊन आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून गुलाबाकडे पाहिले जाते म्हणून या दिवसात गुलाबाला खूप मागणी असते. यावेळी तरुणांच्या उत्साहाला उधाण येत असते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. या डेज च्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल होत असते हे जरी खरे असले तरी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त का लागतो ? आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी नजरेचा एक कटाक्ष आणि चेहऱ्यावरील हास्यही पुरेसे असते. त्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त असावा असे काही नाही. मुळात असे डेज साजरे करावेत की नाही यावर देखील मतमतांतरे आहेत. माझ्यामते कोणावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांना भेटवस्तू देण्यासाठी, त्यांना आनंदी करण्यासाठी, त्यांना आश्चर्यचकित करण्यासाठी, त्यांना आपल्या मनातील भावना सांगण्यासाठी कोणत्याही डे ची गरज नसते. बरे हे डे पुराण तरुणांसाठीच असतात असेही नाही. आजच्या सोशल मीडियाच्या युगात तर डेज चे पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, सिस्टर्स डे, ब्रदर्स डे, डॉटर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अति झाले नि हसू आले अशी गत या डेज ची झाली आहे. सोशल मीडियावर ॲक्टीव असणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडतो. वर्षभर कधी आई वडीलांप्रती आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप ॲक्टीव असतात. जन्मदात्या आई वडिलांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डे ची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमूल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेज ची गरज आहे का ? असा प्रश्न प्रत्येकाने विचारून पहावा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!

-श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे



# भिवंडीचा 'तात्या' अटकेत

## सुरेश म्हात्रेंच्या लोकसभेतील हालचालींमुळे वेगाने सूत्र हलली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी – बीड, परभणीसारख्या गंभीर परिस्थितीची पुनरावृत्ती भिवंडी शहर, ग्रामीण भागात निर्माण होऊ नये. भिवंडी शहर परिसरातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांनी लोकसभेत १४ गंभीर गुन्हे दाखल एका कुख्यात इसमाचा उल्लेख संसदेत करून कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर ठाणे ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ हालचाली करून इगतपुरी येथून सुजित पाटील उर्फ तात्या यांना अटक केली आहे.

ग्रामीण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादासो एडके यांनी ही माहिती माध्यमांना दिली. पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी, की सुजित पाटील उर्फ तात्या यांच्यावर एकूण १४ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यांच्यावर एका गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायद्याने (मोक्का) कारवाई करण्यात आली होती. चार वर्ष ते





तुरुंगात होते. तुरुंगातून पॅरोलवर बाहेर आल्यानंतर त्यांनी पुन्हा आपल्या जुन्याच मार्गाने जाण्याचा प्रयत्न केला होता.

मागील चार ते पाच वर्षांच्या कालावधीत सुजित पाटील यांचे नाव भिवंडी परिसरात सर्वाधिक चर्चेत होते. भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी आपल्या लोकसभा मतदारसंघात बीड, परभणी सारख्या घटना घडू नयेत. या भागातील कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती शांत राहावी यासाठी सरकारने प्रयत्न करण्याची मागणी लोकसभेत केली होती. त्यांच्या भाषणाचा पूर्ण रोख १४ गुन्हे दाखल सुजित पाटील उर्फ तात्या यांच्या दिशेने होता. खासदार म्हात्रे यांनी लोकसभेत प्रश्न उपस्थित केल्यानंतर वेगाने सूत्र हलली.


ठाणे ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने सुजित पाटील यांचा माग काढून त्यांना नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथून अटक केली. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली. तात्या यांची कसून चौकशी करण्याची मागणी भिवंडी परिसरातील तक्रारदार नागरिकांकडून करण्यात येत आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने सुजित पाटील यांचा ताबा भिवंडी तालुका पोलिसांना अधिकच्या तपासासाठी दिला आहे.

## भिवंडी निजामपूर महानगरपालिकेची

# अनधिकृत नळ जोडण्यांवर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी –१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे- पद्यानगर, साईलीला अपार्टमेंट, ऐ-विग पद्यानगर, भिवंडी येथे पाहणी केली असता त्याठिकाणी साईलीला सोसायटीचे सेक्रेटरी श्री. दुर्गादास वासुदेव सबनवार (राजू) यांनी मनपाची कोणतीही रीतसर परवानगी न घेता मनपाचा रस्ता खोदून व्यासाचे ०२ नळ कनेक्शन १"व्यासाचे ०१ नळ कनेक्शन अनधिकृतपणे घेतले असल्याने रस्त्याचे नुकसान (DSR रेट नुसार रु.१४,०९९/०४०१ मी) रु. १४,०९९/- खड्डा पावती (प्रती खड्डा रु.१४००/-× ०३ कनेक्शन) रु.४,२००/- पाण्याची चोरी (प्रती 15 कने. आर.सी.सी बांधकाम रु.२.१००/- ४०२ कनेक्शन) रु. ४,२००/- (प्रती १०कने, आर.सी.सी बांधकाम रु.१२,०००/०१ कनेक्शन) रु. १२,०००/- , अनामत रक्कम (रु. २००/- प्रमाणे ५०३ कने.) रु.६००/- व ट्यापिग फी (रु.५०/- प्रमाणे ०३ कने.)= रु. १५०/- असे एकूण रु.३५.२४९/- (अक्षरी रु. पस्तीस हजार दोनशे एकूणपन्नास रु मात्र) नुकसान केल्याने त्यांचेवर भिवंडी शहर पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं. (B. N.S) २०२३ चे कलम



३२४(४),३२४(५),३०३ (२) व ३२६ (७) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

२) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोजे कणेरी, गुरुकृपा बार अँड रेस्टोरंटचा बाजूला, भिवंडी येथे पाहणी केली असता त्याठिकाणी श्री. श्रीराम पाटील यांनी मनपाची कोणतीही रीतसर परवानगी न घेता मनपाचा रस्ता खोदून %" व्यासाचे ०१ नळ कनेक्शन अनधिकृतपणे घेतले असल्याने रस्त्याचे नुकसान रु. २०,०००/-, पाण्याची चोरी रु. १५,०००/-, असे एकूण रु.३५,०००/- (अक्षरी रु. पस्तीस हजार रु मात्र) नुकसान अनधिकृत केल्याने त्यांचेवर भिवंडी शहर पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं.(B. N.S) २०२३ चे कलम ३२४ (४), ३२४ (५),३०३(२) व ३२६ (०) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

३) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोने निजामपुरा, घर नं १३५२, नाशिक रोड गार्डन प्लाझा, बंजारपट्टी नाका, भिवंडी येथे पाहणी केली असता त्याठिकाणी श्री. युनूस अय्यूब खान यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवागनी न घेता महानगरपालिकेचा जल वाहिनीला छिद्र पाडून नूर शाह कॅफेकरिता ११२" व्यासाचे (व्यापारी) २ नळ कनेक्शन अनधिकृतपणे घेतल्याने पाण्याची चोरी रु. २०,०००/-रस्त्याचे नुकसान रु.१५,०००/- असे एकूण रु.३५,०००/- (अक्षरी रु. पस्तीस हजार मात्र) नुकसान केल्याने त्यांचेवर निजामपुरा पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं. (B. N.S) २०२३ चे कलम ३२४(४),३०३(२) व ३२६ (०) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची कारवाई मा. प्रशासक तथा आयुक्त सो, यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता श्री संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, मा. उप अभियंता श्री सर्फराज अंसारी यांचे अधिपत्याखाली श्री विराज भोईर (पचक प्रमुख), नफीस मोमीन (सहा. पथक प्रमुख) यांचे मार्फत करण्यात आली.

# कर्करोग आणि आयुर्वेद

**- डॉ. प्रतिक्षा घोड़विंदे**
**(बीए एम एस एम.डी )**

जगभरामधे तसेच भारतातही आज कर्करोग म्हणजेच कैन्सर हा व्याधी वेगाने वाढ़त आहे. कैंसरच्या प्रतिबंधसाठी व योग्य उपचारासाठी मोठी चळवळच उभी राहायला पाहिजे. कैन्सर चिकित्सा करणारे वैद्य मोठ्या प्रमाणात निर्माण होनेही तितकेच आवश्यक आहे.

तर मग हा कर्करोग नक्की आहे तरी काय? कशामूळे होतो? याची चिकित्सा काय करता येईल? असे अनेक प्रश्न लोकांना पडत असतात. या आजारविषयी लोकांमधे तसेच अनेक वैज्ञानिकांमधे भयावह वातावरण पाहवायस मिळते. अनेक आयुर्वेदिक वैद्य कैन्सरची चिकित्सा यशस्वीपने करत आहेत. तर काही वैद्य फक्त कैन्सर तज्ञ म्हनूनही ओळखले जात आहेत.

कर्करोग (Cancer) हा मानवणूटिल एक हानिकारक आजार आहे. हा आजार सामान्यतः शरीरातील पेशींमध्ये अनियंत्रित वाढ आणि विभाजनामुळे निर्माण होतो. कर्करोगाचे विविध प्रकार आहेत, ज्यामध्ये स्तन कर्करोग, लंग कर्करोग, कोलोरेक्टल कर्करोग, त्वचा कर्करोग, आणि प्रोस्टेट कर्करोग यांचा समावेश होतो.

**कर्करोगाची लक्षणे**

कर्करोगाची लक्षणे त्याच्या प्रकारानुसार बदलू शकतात. काही सामान्य लक्षणे खालीलप्रमाणे:

1. अनियंत्रित वजन कमी होणे - कोणत्याही विशेष कारणाशिवाय वजन कमी होणे.
2. शारीरिक थकवा - कमी ऊर्जा व सामान्य कार्ये करणेसाठीही थकवा जाणवणे.



शरीराच्या विविध भागात दुखणे वा सूज येणे.
4. अन्नाची आवड कमी होणे - अन्नाची इच्छा कमी होणे किंवा चव न लागणे.
5. गर्भाशयातील रक्तस्राव - स्त्रियांसाठी हे एक चिंताजनक लक्षण असू शकते.
6. त्वचेमध्ये बदल - मोत्यासारखा (mole) किंवा पिग्मेंटेशनमध्ये बदल.

**कर्करोगाचा कारण**

कर्करोगाचे कारण अनेक असू शकतात. यामध्ये आनुवंशिक घटक, जीवनशैली, आणि पर्यावरणीय घटक यांचा समावेश आहे:

तात्त्विक घटक - जीनमधील बदल.
जीवनशैली - धुम्रपान, मद्यपान, आणि अस्वास्थ्यकर आहार.
पर्यावरणीय घटक - प्रदूषक, विषारी पदार्थ, आणि किर्णोत्सर्जन.

आयुर्वेदानुसार विचार केला तर ही धातूनिर्मिती मधील विकृती आहे. यासाठी धातू उत्पत्ति समजून घेणे आवश्यक आहे.आहाराचे पचन जठराग्निद्वारे कोष्ठात होते.त्यातून आहाररस - रसधातू तयार होतो व रस धातूपासून अन्य सात धातू क्रमाने तयार होतात. धातूंचे पोषण योग्य प्रकारे नाही झाल्यास धात्त्वाग्नी मांद होतो व पेशींची निर्मिती आणि विभाजन या क्रियेत बाधा निर्माण हे विभाजनाचे कार्य शरीरातील वायू द्वारे केले जाते म्हणजेच यात दोष व धातूंची विकृती आढळते.

कृषी क्षेत्राचा कर्करोगाशी संबंधित असलेला प्रभाव विविध पैलूंमध्ये दिसून येतो. कृषी उत्पादन, आहार, आणि पर्यावरण हे सर्व घटक कर्करोगाच्या जोखमीवर प्रभाव टाकू शकतात. खाली काही महत्त्वाचे मुद्दे दिले आहेतः

**1. कृषी उत्पादन आणि आहार**
कृषी उत्पादनातील गोष्टी - पिकांमध्ये वापरण्यात येणाऱ्या कीटकनाशकांचा, विषाणूंचा आणि रासायनिक खतांचा वापर कर्करोगास कारणीभूत ठरू शकतो. या रासायनिक पदार्थांच्या दीर्घकालीन संपर्कामुळे मानव शरीरावर नकारात्मक प्रभाव होऊ शकतो. आहारातील घटक - शेतात उत्पादन केलेल्या खाद्यपदार्थांचे सेवन मानवाच्या आरोग्यावर थेट प्रभाव पाडते. अत्यधिक प्रोसेस केलेले अन्न किंवा आर्टिफिशियल घटक असलेल्या खाद्यपदार्थांमध्ये कर्करोगाचे धोकादायक घटक असण्याची शक्यता असते.

**2. पर्यावरणीय प्रभाव**
पाण्याचे प्रदूषण - कृषी अवशेषे, रासायनिक खतें आणि कीटकनाशके पाण्यात मिसळल्यास जल प्रदूषण होते, ज्यामुळे मानवांच्या आरोग्यावर हानीकारक परिणाम होऊ शकतो. हवा व मातीचे प्रदूषण - कृषी प्रक्रिया आणि औषधांचा वापर यामुळे हवेतील आणि मातीतले प्रदूषण वाढते, ज्यामुळे कर्करोगाचा धोका वाढतो.

**3. सामाजिक आणि आर्थिक प्रभाव**
अवतीभोवतीच्या कुटुंबे व सामुदायिक आरोग्य - कृषिप्रधान क्षेत्रातील कुटुंबे अनेकदा रासायनिक पदार्थांसाठी अधिक संवेदनशील असतात. या कुटुंबांमध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढू शकते. कृषी कामगार - कृषी कामगारांना कीटकनाशकांच्या व अन्य रासायनिक पदार्थांच्या संपर्कामुळे विविध आजार होऊ शकतात, ज्यात कर्करोगाचा समावेश असतो.

**4. शिक्षण व जन जागरूकता**
शेतकऱ्यांमध्ये जागरूकता - कर्करोगाच्या जोखमींविषयी शेतकऱ्यांना शिक्षित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सुरक्षित कीटकनाशकांचा वापर, शाश्वत कृषी पद्धती, आणि आरोग्यदायी आहाराबद्दल अधिक माहिती देणे आवश्यक आहे.

**5. कृषी संशोधन आणि विकास**
नवीन तंत्रज्ञान -शाश्वत कृषी पद्धती आणि जैविक शेती तंत्रज्ञानाचा वापर करणे अनेक वेळा कर्करोगाच्या जोखमींना कमी करण्यात मदत करू शकते.

कृषी आणि कर्करोग यांच्या संबंधात एक एकसूत्री दृष्टीकोन विकसित करणे आवश्यक आहे, जेणेकरून याच्या प्रभावी व्यवस्थापनाद्वारे आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिक चांगले निकाल साधता येतील.

अयोग्य वेळी, अयोग्य प्रमाणात, अयोग्य आहाराचे सेवन, फास्ट फूड, जंक फूड, ही सर्व प्रकारची कॅन्सर होण्याची कारणे आहेत. ती टाळावी. त्यानंतर आपण कॅन्सरवर विजय प्राप्त करू शकतो. ज्यांच्या फॅमिली मध्ये कॅन्सरचे रुग्ण असतील त्यांनी विशेषतः काळजी घ्यावी.

दैनिक जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# समाजात प्रेम, शांतता, सद्भावना निर्माणाचे ब्रह्मकुमारींचे कार्य प्रशंसनीय

## - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : एकीकडे मनुष्य विज्ञान तंत्रज्ञान, उद्योग व व्यवसायात प्रगती करीत असताना दुसरीकडे तो वैयक्तिक व भावनिक स्तरावर अशांत होत आहे. अशावेळी ब्रह्मकुमारी संस्थेच्या भगिनींचे समाजात प्रेमभावना, शांतता व सद्भावना निर्माणाचे कार्य अतिशय प्रशंसनीय आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केले.

' वैश्विक संस्कृती, प्रेम, शांतता व सद्भावना' या ब्रह्मकुमारी संस्थेच्या कला व सांस्कृतिक विभागाच्या जागतिक अभियानाचे राज्यातील उद्घाटन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे पार पडले, त्यावेळी राज्यपाल बोलत होते. कला आणि कलाकारांच्या माध्यमातून तरुण पिढीला भारताच्या संस्कृती आणि सनातन मूल्यांशी जोडणे हा या अभियानाचा उद्देश आहे. कार्यक्रमाला चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकार उपस्थित होते. स्वतःसाठी जगणे चुकीचे नाही. परंतु केवळ स्वतःसाठी जगणे चुकीचे असल्याचे सांगताना ब्रह्मकुमारी संस्था ध्यान व राजयोग यांच्या माध्यमातून प्रेम व शांतता या प्राचीन मूल्यांना नव्या पिढीपुढे आणण्याचे कार्य करीत असल्याबद्दल राज्यपालांनी आनंद व्यक्त केला. आज मुक्त व्यापारामुळे जग लहान गाव झाले आहे. व्यापार वाढला आहे, त्यातून ग्राहकाचा फायदा होत आहे. परंतु अनेक क्षेत्रात जीवघेणी स्पर्धा वाढली आहे. स्वतःला ओळखून इतरांसाठी कार्य करीत नाही तोवर मनुष्य जीवन अपूर्ण असल्याचे राज्यपालांनी नमूद केले. आज जीवन खूप गतिमान झाले आहे. अशावेळी ध्यानाच्या माध्यमातून चित्त स्थिर करता येते व सकारात्मक विचार अंगीकारता येतात, असे त्यांनी सांगितले. जीवनात सत्ता आणि पैसा या गोष्टी देखील महत्त्वाच्या आहेत, परंतु त्याचा उपयोग इतरांच्या सेवेसाठी झाला पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले. सर्वांनी एकत्रित काम करून देशाला बलशाली केले पाहिजे. देश बलशाली झाल्यानंतर प्रेम व सद्भावनेचा विचार जगाला दिल्यास त्याला लोक महत्त्व देतील, असे राज्यपालांनी सांगितले. कलाकारांच्या जीवनात प्रेम, शांती व सद्भावना महत्त्वाचीः पूनम ढिल्लन चित्रपटसृष्टी ही इतरांना आनंद देणे व मनोरंजन करण्यासाठी निर्माण झाली असली तरी देखील प्रत्येक कलाकाराला स्वतःच्या समस्या असतात. त्यामुळे कलाकारांना आत्मिक शांतीसाठी प्रेम, शांतता व सद्भावनेची विशेष गरज असल्याचे अभिनेत्री पूनम ढिल्लन यांनी यावेळी सांगितले. जीवनात इतरांशी तुलना नको कारण प्रत्येक जण अद्वितीय असतो, असे त्यांनी सांगितले.


# सर्वाधिक रक्त संकलन

# जे. जे. महानगर रक्तपेढीला पुरस्कार

## राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेने केला गौरव

कल्याण : महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक रक्त संकलनासाठी जे. जे. महानगर रक्तपेढीला विशेष पुरस्कार देण्यात आला असून नवी दिल्ली येथील राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेने हा गौरव केला आहे. कोची केरळा येथे पार पडलेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार भारत सरकारचे आरोग्य सेवांचे संचालक डॉ. अतुल गोएल, सचिव पुण्या सालीला श्रीवास्तव यांच्याहस्ते जे. जे. महानगर रकटपेढीला प्रदान करण्यात आला असून रक्तपेढीचे संचालक डॉ. हितेश पगारे आणि जनसंपर्क अधिकारी अजय भिसे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

गरजू रुग्णांना रक्त देण्यासाठी रक्तपेढीची भूमिका महत्त्वाची असते.




रक्तदान करणाऱ्या रक्तदात्याकडून रक्त संकलित करून त्याची तपासणी करून प्लेटलेट, प्लाझ्मा आणि आरबीसी अशी वर्गवारी करून ते शीतपेटीत सांभाळावे लागते. हे सर्व करण्यासाठी रक्तपेढी अत्याधुनिक असणे आणि कुशल कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे. या सर्व बाबी जे. जे. महानगर रक्तपेढी पूर्ण करत असून महाराष्ट्र शासनाची सर्वात मोठी अत्याधुनिक रक्तपेढी आहे. यामध्ये 30 कर्मचारी अहोरात्र मेहनत घेत असून या कर्मचाऱ्यांमध्ये महिलांची संख्या जास्त आहे.

मुंबईसह ठाणे जिल्ह्यातील रुग्णांना रक्तपेढीच्या माध्यमातून रक्त पुरवठा केला जातो. थॅलेसीमिया, सिकलसेल, ॲनिमिया रुग्णांना मोफत रक्त दिले जाते. यामध्ये ठाणे जिल्हयातील ठाणे आणि उल्हासनगर सिव्हिल रुग्णालयांचा समावेश आहे. हे रक्त संकलित करण्यासाठी रक्तपेढी वर्षभर विविध ठिकाणी रक्तदान शिबिरात जाऊन रक्त संकलित करत असते. यासाठी विविध सामाजिक संस्था मदत करत असतात. यामध्ये प्रामुख्याने संत निरंकारी मिशन, नाना धर्माधिकारी ट्रस्ट, तेरापंती समाज, लायन्स क्लब कल्याण, विविध महाविद्यालये, रेल्वे युनियन, सिद्धिविनायक संस्था, संडे फ्रेंडस एनजीओ, नरेंद्र महाराज संस्थान आदींचा समावेश आहे.

या सर्व संस्थांच्या माध्यमातून जमा झालेल्या रक्ताचा फायदा वर्षभरात मुंबई आणि उपनगरातील सुमारे एक लाख रुग्णांना होत असल्याची माहिती जे. जे. महानगर रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी अजय भिसे यांनी दिली. तर अशा प्रकारे रक्तदान शिबिरांचे आयोजन करायचे असल्याचे रक्तपेढीशी संपर्क करण्याचे आवाहन जनसंपर्क अधिकारी अजय भिसे यांनी केले आहे. संपर्क अजय भिसे : 9869403777

# बदलापुरातील वादग्रस्त शाळेवर जिल्हाप्रशासनाची कारवाई

## विनयभंग प्रकरणातील अनधिकृत शाळा अखेर बंद

**ज्या शाळेत हा प्रकार घडला, त्या शाळेच्या वर्गांना शिक्षण विभागाची कोणतीही परवानगी नसल्याची माहिती महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोगाच्या पाहणी समोर आली आहे. या शाळेला पहिली पर्यंत शिक्षण विभागाची परवानगी आहे. मात्र बेकायदा पद्धतीने शाळा दहावीपर्यंत गेल्या अनेक वर्षांपूर्वीच बिनधास्त सुरू आहे .गटशिक्षणाधिकारी आणि पालिकेच्या शिक्षण विभागाचं यांकडे लक्ष न गेल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.दरम्यान आता या शाळेत शिकणाऱ्या २ री ते १० वीच्या शेकडो विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळेत स्थलांतरित करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतलाय. तसेच बदलापुर आणि अंबरनाथ शहरातील बेकायदा सुरू असलेल्या शाळांची माहिती सादर करण्याचे आदेश महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोगाने गटशिक्षण अधिकाऱ्यांना दिलेत.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर येथील एका शाळेत १४ वर्षाच्या मुलीचा शाळेतील शिक्षकानेच विनयभंग केल्याची संतापजनक घटना काही दिवसांपूर्वी उघडकीस आली होती. याप्रकरणी बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्यांनी अधिक चौकशी केली असती ही शाळाच अनधिकृत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. या शाळेवर आता कारवाई करण्यात आली असून शाळेतील दुसरी ते दहावी पर्यंतच्या वर्गांना टाळे ठोकण्यात आले आहे. तर येथील विद्यार्थ्यांना पालकांच्या संमतीने शहरातील एका मान्यताप्राप्त शाळेत प्रवेश देण्यात आले आहेत. यामुळे पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. बदलापूर पश्चिमेच्या एका खासगी शाळेत एका १४ वर्षीय मुलीचा शिक्षकानेच विनयभंग केल्याची घटना पाच दिवसांपूर्वी समोर आली होती. मुलीने या संदर्भात पालकांकडे तक्रार केली असता पालकांनी पोलीस ठाण्यात धाव घेतल्यानंतर संबंधित शिक्षकाला अटक करून त्याच्यावर पोक्सो आणि अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला. राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने यांची गांभीर्याने दखल घेऊन आयोगाच्या सदस्य नीलिमा चव्हाण यांनी बदलापूर पश्चिम पोलीस ठाणे आणि संबंधित शाळेत भेट देऊन माहिती घेतली. यावेळी शाळेत केलेल्या तपासणीत शाळेचे वर्ग अनधिकृत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या शाळेला फक्त इयत्ता पहिलीपर्यंत परवानगी होती. मात्र शाळेत दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे वर्ग भरत असल्याचे समोर आले होते. शिशुवर्ग ते दहावी या इयत्तांमध्ये शाळेत १६९ विद्यार्थी शिकत होते. शाळाच अनधिकृत असल्याने येथील इतर विद्यार्थ्यांना आणि पालकांसमोर मोठे संकट उभे राहिले होते. मात्र मुलांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी जिल्हा महिला बालविकास विभाग, पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग यांची शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांसमवेत नुकतीच बैठक पार पडली. यावेळी दुसरी ते दहावीतील सर्व विद्यार्थ्यांना शहरातीलच एका मान्यताप्राप्त शाळेत प्रवेश घेऊन देण्यात आले आहेत.

# पंधरा वर्षानंतर पालिका रुग्णालयांची साफसफाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : वसई विरार महापालिकेच्या स्थापनेनंतर १५ वर्षानंतर प्रथमच पालिकेच्या रुग्णालय आणि आरोग्य केंद्रांची स्वच्छता करण्यात आली. शनिवारी सर्व आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना साफसफाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर रुग्णालये आणि आरोग्यकेंद्राची साफसफाई करणे, भंगार साहित्य काढणे, अडगळीच्या जागा मोकळ्या करणे आदी कामे करण्यात आली.

वसई विरार महापालिकेची स्थापना जुलै २००९ साली झाली. महापालिकेची एकूण ७ रुग्णालये तसेच २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. या रुग्णालयांची आजवर स्वच्छता करण्यात आली नव्हती. सर्वत्र भंगार साहित्य पडलेले होते. न वापरलेली उपकरणे, साहित्य अडगळीत पडले होते. त्याचा मोठा ई कचरा जमा झाला होता. कागदपत्रांच्या रद्दीचे ढिगच्या ढिग साचले होते. दैनंदिन स्वच्छता वरवर करण्यात येत होती.पंखे देखील कधी पुसण्यात आले होते. सर्वत्र जळमटं साचली होती. यामुळे रुग्णालये आणि आरोग्य केंद्रे बकाल बनून मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी येत होती. पालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांनी पाहणी केल्यानंतर ही दुरवस्था आढळली. ताबडतोब त्यांनी सर्व संबंधित रुग्णालयाचे प्रमुख, वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुग्णालये आणि आरोग्य केंद्रांच्या स्वच्छतेचे आदेश दिले. ही स्वच्छता मोहीम लवकरात लवकर घेण्याचे आदेश देताना मी कुठल्याही क्षणी पाहणी करेन आणि स्वच्छता न दिसल्यास कारवाई केली जाईल असा सज्जड दमच दिला होता. सोमवार ते शुक्रवार हा कामाचा व्यस्त दिवस असतो. त्यामुळे शनिवारचा दिवस साफसफाईसाठी निवडण्यात आला. सर्व आरोग्य विभागातील कर्मचारी या मेगा स्वच्छता मोहीमेत सहभागी झाले होते. सर्व ७ रुग्णालये आणि २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात एकाच वेळी ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पंखे, खिडक्या पुसण्यात आल्या. जमीनी, परिसर, जीने धुण्यात आले. जळमटे काढण्यात आली. अडगळीत पडलेले साहित्य, न वापरेलेली उपकरणे, रद्दी पेपर्स, जुन्या फाईली आदी काढण्यात आल्या. यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी समाधान व्यक्त केले.



**पालिकेच्या रुग्णालयात सर्वसामान्य रुग्ण येत असतात. त्यांना चांगली सेवा देणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. रुग्णालयाचा परिसर स्वच्छ असावा, दुर्गंधी येऊ नये, प्रसन्नता वाटावी यासाठी ही मोहीम घेण्यात आली होती, असे वसई विरार महापालिकेचे अतिरिक्त आयुक संजय हेरवाडे यांनी सांगितले.**



# रायगड जिल्ह्यातील उद्योगात परप्रांतीयांची नोकर भरती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उरण : राज्यातीलच नव्हे तर देशातील उद्योग नगरी म्हणून ओळख असलेल्या उरणच्या भूमिपुत्रांना आपल्या हक्काच्या रोजगारासाठी लाखो रुपये मोजावे लागत आहेत. यात अभियांत्रिकीचे उच्च शिक्षण घेणाऱ्यांचा समावेश असून डिग्री, डिप्लोमा असतानाही येथील अनेक तरुण बेरोजगार आहेत. उरणमध्ये प्रथम १९७५ मध्ये ओएनजीसीचा तेल शुद्धीकरण प्रकल्प उभारला गेला. त्यानंतर वायू विद्युत केंद्र आणि त्यापाठोपाठ जेएनपीटी सारखे देशातील सर्वात मोठे बंदर ही उभे राहिले. त्याचप्रमाणे भारत पेट्रोलियमचा घरगुती गॅस भरणा प्रकल्पही उरणमध्ये आहे.

हे सर्व केंद्र आणि राज्य सरकारचे सर्वात मोठे व सार्वजनिक क्षेत्रातील नवरत्नपैकी प्रकल्प आहेत. त्याचप्रमाणे वाढत्या आयात निर्यात व्यापारामुळे संपूर्ण तालुका हा बंदरातून मालाची ने-आण करणाऱ्या गोदामाच गाव बनले आहे. तर दुसरीकडे जेएनपीटीचे खासगीकरण झाल्याने आज याच बंदरात एकूण सहा खासगी बंदर मालाच्या कंटेनर हाताळणीचे काम करीत आहेत. त्यामुळे या परिसरात लाखो रोजगार निर्माण झाले आहेत. यात काही प्रमाणात स्थानिकांना रोजगार आणि स्वयंरोजगार मिळाला आहे. मात्र अनेक उद्योगात स्थानिकांव्यतिरिक्त परप्रांतीयांची भरती मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

नव्याने उभे राहणाऱ्या उद्योगात अगदी कमी वेतनावर(ज्यात राज्य व केंद्र सरकारने निश्चित केलेले साधे किमान वेतनही दिले जात नाही) कर्मचाऱ्यांना राबविण्यात येत आहे. अभियंता असलेल्या तरुणांना महिना १५ ते २० हजार रुपयांवर गुजराण करावी लागत आहे. मात्र तरीही तरुण अशा प्रकारच्या कंत्राटी पद्धतीच्या रोजगारासाठी सात ते दहा लाख रुपये मोजत आहेत. त्यासाठी घरातील सोने, स्थावर मालमत्ता किंवा शेतजमिनी विकल्या जात आहेत. येथील विविध खासगी उद्योगात नोकर भरती करण्यासाठी राजकीय नेते आणि त्यांचे चेले पेले हे अशा बेरोजगार व गरजवंत तरुणांची लूट करीत आहेत.



**उरणची औद्योगिक नगरी ही येथील शेतकऱ्यांच्या आणि स्थानिकांच्या त्यागातून उभी आहे. मात्र नोकर भरतीत भूमिपुत्रांना डावलून परप्रांतीयांना स्थान दिले जात आहे. सुरक्षा रक्षक ते अभियंत्यापर्यंतच्या नोकरीसाठी स्थानिकांना लाखो रुपये मोजावे लागत आहेत. यासाठीच हुतात्म्यांनी रक्त सांडले का? त्यांचे रक्त वाया जाऊ देता कामा नये यासाठी नोकर भरतीत शासकीय हस्तक्षेप सुरू करावा.**

# रिंग रोडमधील बाधित बांधकामे निष्कासित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवलीतील महत्वांकाक्षी बाह्यवळण रस्त्यात (रिंग रोड कल्याण फेज-5) अटाळी येथे सुमारे 565 रुमची बांधकामे ही बाधित होत आहेत. यापैकी गेल्या 2 महिन्यात 319 रुम्स तोडण्यात आले. आजच्या कारवाईमध्ये उर्वरित सुमारे 118 रुम्सची बांधकामे निष्कासनाचे काम प्रस्तावित आहे. त्यापैकी आतापर्यंत जवळ-जवळ 70 रुम्स निष्कासित करण्यात आल्या आहेत. उर्वरित कारवाई सुरु असून, ही कारवाई उद्याही चालू राहणार असल्याची माहिती अ प्रभागाचे सहा.आयुक्त प्रमोद पाटील यांनी दिली. हि कारवाई अतिक्रमण नियंत्रण विभागातील 5 पोलीस कर्मचारी, 1 जेसीबी व अतिक्रमण नियंत्रण पथकातील कर्मचारी यांच्या सहाय्याने केली जात आहे.

# कल्याण पूर्वेत कोयता गँग सक्रिय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्व भागातील गुन्हेगारांचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी पोलिसांनी या भागातील गुन्हेगारांना तडीपार केले. विशाल गवळी तुरुंगात आहे. तरीही कल्याण पूर्वेतील गुन्हेगारांचे दहशत माजविण्याचे उद्योग कमी होत नसल्याने नागरिक भयभीत आहेत. कल्याण पूर्वेतील आडिवली ढोकळी भागात शनिवारी रात्री एका कलिंगड विक्रेता आणि त्याच्या सहकाऱ्यावर कोयता टोळीने कोयत्याने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले आहे.

या कलिंगड विक्रेत्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी दहशत माजविणाऱ्या कोयता टोळीवर गुन्हा दाखल केला आहे. समीर उर्फ रवी रेड्डी, मनीष चव्हाण, अविनाश झा अशी गुन्हा दाखल इसमांची नावे आहेत. त्यांची कल्याण पूर्व आडिवली, ढोकळी भागात प्रचंड दहशत आहे. ते या भागातील हातगाडी, फेरीवाले, विक्रेत्यांकडून हप्ते घेतात, असे तक्रारदार कलिंगड-भाजीपाला विक्रेता अक्षय कवडे (२४) यांनी मानपाडा पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे.

विक्रेता अक्षय कवडे यांनी पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की आपण मुळचे धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी आहोत. आपण उपजीविकेसाठी हसन शेख, हुसेन शेख यांच्या सहकाऱ्याने कल्याण पूर्वेतील आडिवली ढोकळी भागातील काका ढाब्याच्या बाजुला विजय पाटीलनगर भागात भाजीपाला, कलिंगड विक्रीचा व्यवसाय करतो. आपण नाशिकहून कलिंगड मागवली होती. हे वाहन शनिवारी रात्री ११ वाजता आपल्या दुकानाजवळ आले होते. हसन, हुसेन आणि आपण स्वता कलिंगड ट्रकमधून उतरून घेण्याचे काम करत होतो. त्यावेळी तेथे आडिवली भागात दहशत असणारे इसम रवी रेड्डी, अविनाश झा, मनीष चव्हाण आले.

रवी रेड्डी यांनी ढिगामधील दोन कलिंगडे काढून घेतली. आपण त्यांच्याकडे कलिंगडाचे पैसे मागितले. त्यांनी आपण या भागाचे भाई आहोत. माझ्याकडे कसले पैसे मागतोस असे बोलून विक्रेता अक्षय यांना शिवीगाळ करून रेड्डी याने त्यांच्या दुचाकीमधून कोयता बाहेर काढला. तो हवेत फिरवत आता कोणी मध्ये पडले तर त्याला मारून टाकीन, अशी भाषा करत रवी रेड्डीने अक्षय कवडे आणि त्याच्या साथीदारावर कोयत्याने हल्ला चढविला.हा प्रकार पाहून लोक सैरावैरा पळाली. समीर रेड्डीचे दोन साथीदार मनीष, अविनाश यांनी अक्षय, हुसेन यांना पकडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या तिघांच्या तावडीतून सुटून अंधाराचा फायदा घेत अक्षय, हुसेन मानपाडा पोलीस ठाण्यात पोहचले.

दोघांना कोयत्याच्या गंभीर दुखापती झाल्या होत्या. शास्त्रीनगर रुग्णालयातून दोघांना कळवा येथील छत्रपती शिवाजी रूग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. कल्याण पूर्वेतील गुन्हेगारांचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी कंबरडे मोडले आहे. तरीही या भागातील गुंडांची दहशत कमी होत नसल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करत आहेत. पोलिसांनी रेड्डी, मनीष आणि झा यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# भुईगाव समुद्रात अडकलेल्या तरुणांची सुटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : भुईगाव समुद्रात अडकलेल्या दोन तरुणांची जीवरक्षक आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली. शनिवारी संध्याकाळी ही घटना घडली. सुमारे दिड तास हे बचाव मोहीम सुरू होती. वसई पश्चिमेला असलेल्या समुद्रकिनाऱ्यावर पर्यटक फिरण्यासाठी येत असतात. शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दिवशी मोठी गर्दी होत असते. भुईगाव येथील समुद्रकिनाऱ्यावर प्रशांत राणा आणि दिव्यांश शर्मा हे दोन तरुण असेच फिरण्यासाठी आले होते. ते नालासोपारा येथे राहणारे आहेत. गप्पा मारत ते खोल पाण्यातील समुद्रात असलेल्या खडकावर गेले. मात्र संध्याकाळी भरती आल्याने ते पाण्यातच अडकले. त्यांनी मदतीसाठी धावा सुरू केला. त्यावेळी जीवरक्षक हितेश तांडेल यांनी गावातील दोन तरुणांना सोबत घेतले आणि जीव धोक्यात घालून पाण्यात उतरले. वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाला देखील पाचारण करण्यात आले. रात्रीचा अंधार आणि पाण्याची पातळी वाढल्याने बचाव कार्यासाठी अडथळे निर्माण होत होते. मात्र जीवरक्षक आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी या दोन्ही तरुणांना सुखरूप बाहेर काढले. दोन्ही मुले सुखरूप असून त्यांना पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. समुद्रात जाणे धोकादायक असून पर्यटनाचा आनंद घेताना नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन वसई पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षख बाळकृष्ण घाडीगावकर यांनी दिली



# राजन साळवींचा पक्ष प्रवेश गुलदस्त्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गेल्या काही दिवसांपासून शिवसेना ठाकरे गटाचे नेते राजन साळवी हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत पक्षप्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. अशातच राजन साळवी यांना एकनाथ शिंदेंचा फोन गेल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यावेळी त्यांनी पक्षप्रवेशाची तारीख निश्चित केल्याचं सांगितलं जात आहे. या फोनमध्ये १० तारखेऐवजी १३ तारखेला शिवसेनेत प्रवेश करण्यासंदर्भात बोलणं झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळतेय. मात्र अद्याप याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. दरम्यान, गेल्या काही दिवसांपूर्वी अशाच चर्चा सुरू असताना राजन साळवी यांनी प्रतिक्रिया देत चर्चांना पूर्णविराम दिला होता. "मी नाराज आहे, भाजपच्या वाटेवर असल्याच्या या सर्व अफवा आहेत. मी निष्ठावंत सैनिक आहे. बाळासाहेबांचाच सैनिक राहणार. या बाबत माझ्या मनात कुठलीही शंका नाही" असं राजन साळवी म्हणाले होते. राजन साळवी यांच्या शिवसेनेतील प्रवेशावर शिवसेना नेता आणि मंत्री उदय सामंत यांनी प्रतिक्रिया देताना असे म्हटले की, 'एकनाथ शिंदे आणि राजन साळवी यांची पक्षप्रवेशासंदर्भात चर्चा झाली की नाही याबाबत माहिती नाही. फक्त एकदाच माझी एकनाथ शिंदेंसोबत यावर चर्चा झाली होती. मागच्या वेळी राजन साळवी यांनी एकनाथ शिंदे यांचं नेतृत्व स्विकारावं म्हणून कित्येकदा मी विनंती केली होती. त्यावेळी त्यांनी नकार दिला. पण त्यांच्या मतदारसंघात साळवींविरोधात माझे बंधू निवडणुकीला उभे होते तेव्हा १८ हजार मतांनी त्यांचा पराभव केलाय. त्यामुळे आता लांजा, राजापूर आणि साखरपा हा पूर्ण एकनाथ शिंदेंचा बालेकिल्ला आहे. उबाठाचे ९९ टक्के पदाधिकारी शिवसेनेत काम करतायत. पण साळवींचा १८ हजार मतांनी ज्यांनी पराभव केलाय. त्यांना विश्वासात घेऊन ही प्रक्रिया शिंदे राबवतील', असा विश्वास उदय सामंत यांनी व्यक्त केला.



# ठाण्याच्या मालमत्ता प्रदर्शनात २१४ सदनिकांची विक्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाण्यातील क्रेडाई-एमसीएचआय या बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनेकडून शहरात चार दिवस भरविण्यात आलेल्या यंदाच्या मालमत्ता प्रदर्शनाला २९ हजार १६३ नागरिकांनी भेट दिली. या प्रदर्शनात २१४ ग्राहकांनी सदनिका खरेदी केल्या तर, या सदनिकांसाठी बँका तसेच वित्त संस्थांकडे ७४५ कोटी रुपयांच्या गृह कर्जाचे प्रस्ताव दाखल झाले आहेत. या प्रदर्शन कालावधी लागू केलेल्या 'लाडकी बहीण' योजनेलाही अनेक महिलांनी प्रतिसाद दिल्याचा दावा संघटनेने केला आहे. ठाण्यातील क्रेडाई-एमसीएचआय या बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनेकडून गेल्या २२ वर्षांपासून शहरात मालमत्ता प्रदर्शन भरविण्यात येत आहे. यंदा ढोकाळी येथील हायलँड गार्डन मैदानावर ७ ते १० फेब्रुवारी या कालावधीत हे प्रदर्शन भरविण्यात आले होते. ठाणे शहर तसेच परिसरातील ४० हून अधिक प्रसिद्ध विकसकांनी त्यांच्या गृहप्रकल्पांचे स्टॉल प्रदर्शनात मांडले होते. याशिवाय, १० हून अधिक राष्ट्रीयीकृत बँका आणि गृह वित्त पुरवठादार संस्थांसह बांधकाम क्षेत्रासंबंधी संस्थांचे स्टॉल मांडण्यात आले होते. या प्रदर्शनात ३० लाखांपासून ते ३ कोटींपर्यंतच्या घरांचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले होते. याठिकाणी कार्यालयांच्या वास्तुचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले होते. या प्रदर्शनाला २९ हजार १६३ नागरिकांनी प्रदर्शनाला भेट दिली. सदनिका आणि कार्यालय खरेदीसाठी अनेक ग्राहकांनी प्रतिसाद दिला असून त्यापैकी २१४ ग्राहकांनी सदनिका खरेदी केली आहे. या सदनिकांसाठी बँका तसेच वित्त संस्थांकडे ७४५ कोटी रुपयांच्या गृह कर्जाचे प्रस्ताव दाखल झाले आहेत.

# वसई विरार महापालिका घेणार बेवारस वाहनांचा शोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई: मागील काही वर्षांपासून वसई विरार शहरात बेवारस वाहनांचा प्रश्न जटिल बनला आहे. या बेवारस वाहनांमुळे रहदारीला अडथळे ठरू लागली आहेत. अशा बेवारस वाहनांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महापालिकेने सर्वेक्षण करून बेवारस वाहने हटविली जाणार आहेत. आतापर्यंत सर्वेक्षणात ३५ ते ४० बेवारस वाहने आढळून आली आहेत. वसई विरार शहरात वर्षानुवर्षे रस्त्यावर उभ्या असलेल्या बेवारस वाहने व भंगार साहित्य यामुळे शहराचे विद्रुपीकरण होऊ लागले आहे. त्यासोबत शहरातील वाहतुकीस अडथळा तयार होऊन वाहने चालविण्यास अडचणी निर्माण होत आहेत. शहरात आधीच रस्ते अरुंद व वाहनांची संख्या अधिक आहे. त्यातच बेवारस व भंगारात गेलेली वाहने रस्त्याच्या कडेला उभी करून रस्ते गिळंकृत होऊ लागले आहेत.

वर्षानुवर्षे वर्षे ही वाहने एका जागीच उभी राहत असल्याने समस्या निर्माण होत असतात. अशा वाहनांमुळे वाहतुकीला अडथला निर्माण होत असतो. याशिवाय रस्त्यावरून नागरिकांना ये जा करणेही अडचणीचे ठरते. तर दुसरीकडे या वाहनांचा गैरवापर होण्याचीशी शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी वाहने ही तशीच पडून असल्याने अशा वाहनांत आजूबाजूच्या भागातील लहान मुले ही खेळण्यास जात असतात त्यामुळेही एखादी दुर्घटना होण्याची शक्यता असते. शहरातील रस्त्यांची स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ही वाहने व भंगार साहित्य रस्त्यावर पडून राहिल्याने योग्य रित्या स्वच्छता करता येत नाही.

नागरिकांनी ही बेवारस वाहने हटविण्यात यावी अशी मागणी केली होती. या सर्व समस्या लक्षात घेऊन पालिकेने आता शहरातील बेवारस वाहने व रस्त्यावर ठेवून देण्यात आलेले भंगाराचे साहित्य हटविण्यावर लक्ष केंद्रित केले असून पुन्हा एकदा ही मोहीम तीव्र पणे राबवून शहरातील रस्त्यावर व रस्त्यालगत असलेली वाहने हटवून वाट मोकळी केली जाणार असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले आहे. याबाबत महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार य यांनी सर्व प्रभाग समितीच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार भंगारात पडून असलेल्या बेवारस वाहनांवर सर्वेक्षण करून कारवाई केली जाणार असून यामुळे रस्ते मोकळे होणार आहेत.

सर्वेक्षणात आतापर्यंत ३७ वाहने

वसई विरार महापालिकेने सर्वेक्षण सुरू केले आहे. आतापर्यंत करण्यात आलेल्या सर्वेक्षणात प्रभाग समिती सी मध्ये २० तर प्रभाग समिती आय मध्ये अशा प्रकारची भंगारात पडून असलेली १७ वाहने आढळून आली आहेत. परिवहन सेवेचे सहायक आयुक्त विश्वनाथ तळेकर म्हणाले की, सर्व प्रभाग समितींमधील सर्वेक्षण पूर्ण झाल्यावर अशा बेवारस आणि भंगारात पडून असलेल्या वाहनांना टोईंगच्या माध्यमातून उचलून त्यांची विल्हेवाट लावली जाईल.



# हळदी कुंकू समारंभ संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / कल्याण : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचं औचित्य साधून राज्यभरात शिवसेनेच्या माध्यमातून विविध सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं. अशातच कल्याण पश्चिमेत प्रभाग क्र. 36 बैल बाजार शिवसेना युवा सेनेच्या माध्यमातून प्रतीक पेणकर यांच्या वतीनं महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. बैल बाजार येथील मोरया ग्रँड हॉल मध्ये पार पडलेल्या या हळदी कुंकू सोहळ्यास परिसरातील



महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलं. दरम्यान फक्त हिंदू नव्हे तर मुस्लिम समाजाच्या महिलांनी देखील उत्साहाच्या वातावरणात हळदी कुंकू सोहळ्यात भाग घेतला. प्रतीक पेणकर यांच्यासह प्रणव पेणकर, श्वेता पेणकर, अंकिता पेणकर आदींनी कार्यक्रमाचे आयोजन केलं होतं. यावेळी मोठ्या संख्येने शिवसेनेच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या आणि परिसरातील महिला उपस्थित होत्या.

# बेलगामांना लगाम घालण्याचे काम करणार




**- सुभाष बसवेकर**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : " माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य " ठाणे जिल्ह्याचे कार्यकर्ता मार्गदर्शन शिबीर शनिवार दिनांक ०8/2/2025 रोजी " धर्मवीर आनंद दिघे " हॉल शहापूर येथे आयोजित करण्यात आले होते,यावेळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून "माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे" संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर उपस्थित होते,त्यांनी आपल्या मार्गदर्शन भाषणात म्हटले की,शासन-प्रशासनामध्ये अत्यंत वाईट परिस्थिती असून,आज जनतेच्या दृष्टीने हित न पाहता सद्यस्थितीत लोकशाही धोक्यात आहे,अशा वेळेस माहिती अधिकार कार्यकर्त्यांने निर्भीडपणे तसेच माहिती अधिकार कायद्याचा अभ्यास करून,जनतेला न्याय देण्यासाठी शासन-प्रशासनातील चालकांना "बेलगामांना,लगाम" घालण्याचे काम यापुढे माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी करायचे आहे,अशा कार्यकर्त्यांच्या पाठीशी मी खंबीरपणे सदैव असेन अशा प्रकारे स्पष्ट व प्रखर मत आपल्या मार्गदर्शनपर भाषणात व्यक्त केले.

" माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ" सद्यस्थितीत संपूर्ण महाराष्ट्रात चांगल्या प्रकारे कार्यरत असून,यापैकी ठाणे जिल्ह्यात उत्तम रित्या काम पाहून मला येथील कार्यकर्त्यांचा अभिमान आहे.येथील कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने काम करावे,काही अडचण निर्माण झाल्यास मला केव्हाही संपर्क करा,असेही यावेळेस सांगण्यात आले.

हे मार्गदर्शन शिबीर जिल्हाध्यक्ष शंकर वडवले यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले,यावेळेस सभा मंचकावर जिल्हा महासंघाचे पदाधिकारी अशोक पडवळ,संतोष घुडे,संतोष राऊत,तसेच ठाणे शहर जिल्हाध्यक्ष दयानंद उल्मिक,मुंबई शहर जिल्हाध्यक्ष दीपक पाटील,तालुकाध्यक्ष शांताराम पाटील,दिलीप पवार,महिला आघाडी अध्यक्षा माया मगर आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

या मार्गदर्शन शिबीरात उपस्थित कार्यकर्त्यांपैकी दिनेश दाभणे,विजय गायकवाड,दिलीप पवार,माया मगर,संतोष राऊत,संतोष घुडे,अशोक पडवळ,दयानंद उल्मिक,विजय शेलवले आणि ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष शंकर वडवले यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

या शिबिराच्या प्रसंगी " माहिती अधिकार महासंघ " संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी नवनियुक्त पदाधिकारी शंकर वडवले,कोकण प्रदेश कार्याध्यक्ष,अशोक पडवळ,ठाणे-पालघर ग्रामीण जिल्हाध्यक्ष आदि पदाधिकारी नियुक्तीबद्दल उपस्थित कार्यकर्त्यांसमोर जाहिर केले.तर महासंघात नव्याने काम करणाऱ्या नवीन कार्यकर्त्यांना नियुक्तीबद्दल पत्र देऊन अभिनंदन केले.सदर मार्गदर्शन शिबिराचे प्रस्ताविक,सूत्रसंचालन व आभार देविदास जाधव शहापूर तालुकाध्यक्ष यांनी केले.अशा प्रकारे अत्यंत उत्स्फूर्तपणे शिबीराची सांगता झाली.

# रस्ता बाधितांच्या पुनर्वसनासाठी आमरण उपोषण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने गोविंदवाडी बायपास रस्ता रुंदीकरणामध्ये येथील लोकांना बाधीत केलेले आहे. २००५ पासून येथील बाधीत नागरिक रिपब्लिकन सेनेच्या माध्यमातुन महानगरपालिकेकडे पुनर्वसनासाठी पाठपुरावा करत आहेत. आज पासून या बाधितांनी रिपब्लिकन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मुख्यालया बाहेर आमरण उपोषणाला सुरवात केली आहे. या प्रकरणाची सुनावण्या केल्या नंतर बाधीतांचे पुनर्वसना संबंधी असणारे नस्ती, कागदपत्रे महानगरपालिकेकडुन गहाळ केली जात असल्याचा आरोप



या नागरिकांनी केला असून या तक्रारीवर यथोचीत कारवाई करून बाधितांचे पुनर्वसन करून न्याय मिळवून दयावा या मागणीसाठी हे उपोषण सुरू करण्यात आले आहे.

## सार्वजनिक वाचनालयात

# सायबर सुरक्षेबाबत जागृती



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आपल्या ऑनलाईन खात्यासाठी निरनिराळे पासवर्ड ठेवा. नेट बँकिंग,पासवर्ड,एटीएम क्र., फोनबँकिंग, ओटीपी, सीव्हीव्ही क्र. खात्रीशिवाय शेअर करू नका. १००टक्के सायबर गुन्हे घडत असतील तर त्यातील साधारण २०-२१टक्के गुन्हे आपण करीत असणाऱ्या भ्रमणध्वनीच्या वापरामुळे घडतात. कोणतेही अनोळखी ॲप्स डाऊनलोड करू नका, स्त्रोतांची खात्री केल्याशिवाय स्पॅम-ई-मेल कधीही उघडू नका असे मोलाचे मार्गदर्शन डोंबिवली नागरी सहकारी बँक, डोंबिवलीचे वरिष्ठ व्यवस्थापक अक्षय फाटक यांनी सार्वजनिक वाचनालय कल्याण व कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पु.भा. भावे व्याख्यानमाले अंतर्गत "सायबर सुरक्षा जनजागृती" या कार्यक्रमात केले.

स्मार्ट फोनच्या क्षेत्रात क्रांती झाल्याने भ्रमणध्वनी स्वस्त दरात मिळतात परंतु भ्रमणध्वनी वापराचे कोणतेही प्रशिक्षण दिले जात नाही. गुन्हा घडल्यावर पोलिस तपास यंत्रणा अपुरी पडते. इलेक्ट्रॉनिक मिडिया व डिजिटल डिव्हाईस मुळे समाजाच्या संस्कृतीला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे आज देश सुरक्षित नाही. त्याचबरोबर सायबर स्टॉकिंग, सायबर ग्रुमिंगची ही माहिती दिली. यु.पी. आय ट्रान्झंक्शनला मर्यादा ठेवा. कोणताही मॅसेज काळजीपूर्वक वाचा. ओटीपीला स्वाक्षरी इतकेच महत्त्व आहे त्यासाठी वर्तमानपत्रांचे प्रेरित वाचनही आवश्यक आहे. असे प्रतिपादन मुंबई हायकोर्टचे ॲडव्होकेट संग्राम घुगे यांनी केले.

वाढत्या सायबर गुन्ह्यांवर आळा घालणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी सायबर सुरक्षा जनजागृती सारख्या कार्यक्रमाचे आयोजन वाचनालयाने केले असल्याचे वाचनालयाचे सरचिटणीस भिकू बारस्कर यांनी सांगितले. प्रसंगी वाचनालयाच्या उपाध्यक्षा आशा जोशी, चिटणीस निलिमा नरेगलकर, कार्यकारणी सदस्य अरविंद शिंपी, डोंबिवली नागरी सहकारी बँक ब्रँच मॅनेजर, सहजानंद चौक कल्याणच्या अनुया पिंगळे, ज्येष्ठ वाचक सभासद, ग्रंथसेविका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# मुरबाडमध्ये २०१२ विद्यार्थी देणार बारावीची परीक्षा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेला आज म्हणजेच ११ फेब्रुवारीपासून सुरुवात होत आहे. या परीक्षेसाठी बोर्डाकडून जय्यत तयारी करण्यात आली असून, मुरबाड तालुक्यात मुख्य पाच केंद्रावर ही परीक्षा घेतली जाणार आहे.

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी यंदा मुरबाड तालुक्यातील २०१२ विद्यार्थी बारावीची परीक्षा देणार असून, कॉपीमुक्त परीक्षेसाठी भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. अशी माहिती मुरबाड गट शिक्षणाधिकारी संप्रदा पानसरे यांनी दिली आहे.तसेच मुरबाड तालुक्यातील सर्व परीक्षा केंद्रावर मुरबाड पोलिस खात्याच्या वतीने केंद्रावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती मुरबाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांनी दिली आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५

प्रविष्ठ विद्यार्थी पुढीलप्रमाणे

१) न्यू इंग्लिश स्कूल मुरबाड - ५०७
२) सरळगाव विभाग हायस्कूल सरळगाव - २०८
३) विद्यामंदिर हायस्कूल शिवळे - ६८५
४) महात्मा गांधी विद्यालय धसई - ३६४
५) शारदा विद्यालय टोकावडे - २४८
एकूण - २०१२

तालुक्यातील परीक्षा केंद्रावर भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. सर्वच ठिकाणी पोलीस चौक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.
संप्रदा पानसरे ,गटशिक्षणाधिकारी, मुरबाड पंचायत समिती विभाग

# युवा सेना पदाधिकारी करणार चांदा ते बांदा दौरा

## 'घर तिथे शिवसैनिक, गाव तेथे शिवसेना' युवासेनेचे अभियान




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली, युवा खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश परिषा प्रताप सरनाईक, युवासेना मुख्य सचिव राहुल लोंढे, युवासेना सचिव किरळ साळी यांचा दि. १४ फेब्रुवारी २०२५ ते दि. ३० एप्रिल २०२५ दरम्यान 'युवा विजय महाराष्ट्र' दौरा आयोजित करण्यात आला आहे. दौऱ्याच्या अनुषगांने तयार करण्यात आलेल्या रथाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ९ फेब्रुवारी रोजी वाढदिवसानिमित्ताने ठाणे येथे भगवा झेंडा दाखवून युवा विजय महाराष्ट्र दौऱ्याला शुभेच्छा दिल्या. या दौऱ्यासाठी ४० रथ सज्ज झाले आहेत. शिवसेनेची संघटनात्मक बांधणी, युवासेनेचा विस्तार, महाविद्यालयीन युनिट्स तयार करणे हे या दौऱ्याचे उद्दिष्ट आहे. 'घर तिथे शिवसैनिक, गाव तेथे शिवसेना' या संकल्पनेद्वारे गावोगावी शिवसेनेचे संघटन मजबूत करण्यात येणार आहे.

# महाविद्यालयातूनच कौशल्याचे धडे मिळतात

**- अभिनेत्री अर्चना महादेव**




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पारनेर : निघोज - ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महाविदयालयातूनच कौशल्याचे धडे मिळतात , माझे ही शिक्षण ही जामगाव सारख्या खेडेगावातूनच झालेले असल्याने प्रतिपादन प्रसिद्ध सिने अभिनेत्री अर्चना महादेव यांनी केले .

नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निघोज येथील श्री मुलिकादेवी महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. विविध गुणदर्शन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावरून बोलताना प्रसिद्ध सिने अभिनेत्री अर्चना महादेव म्हणाल्या पुढे म्हणाल्या की , विद्यार्थी दशेत शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध स्पर्धेत भाग घेतल्यानंतर आपल्यात अनेक गुण अवगत होत असतात. वकृत्व स्पर्धा, वाद विवाद स्पर्धा, नृत्य स्पर्धा, काव्य स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, नाट्य स्पर्धा आदी स्पर्धेमधून वाचन लेखन व बोलणे सुधारते. आपल्याला नेमकी कोणते कौशल्य अधिक चांगल्या पद्धतीने अवगत आहे , हे त्याच वेळी ओळखता येते. शाळा महाविद्यालयांमधून विविध स्पर्धांमध्ये जी संधी मिळते , त्यामध्येच विद्यार्थ्यांचे भविष्य दडलेले असते. मला देखील अभिनयाचे क्षेत्र महाविद्यालयात मिळालेल्या संधीमुळेच प्राप्त झाले. मुलींनी समाज काय म्हणेल , नातेवाईक काय म्हणतील , याचा विचार बाजूला ठेवून आपले ध्येय ठरवावे व आपण निवडलेल्या क्षेत्रात पूर्ण योगदान देण्याचे प्रयत्न करावे. असे प्रतिपादन त्यांनी केले.

संमेलनाच्या कार्यक्रम प्रसंगी श्री ढोकेश्वर महाविद्यालय टाकळी ढोकेश्वर येथील ज्येष्ठ प्रा. वीरेंद्र धनशेट्टी सर यांनी आपल्या मार्गदर्शनामधून संस्थेचा व महाविद्यालयाचा अनुबंध सांगितला.

अध्यक्ष स्थानावरून मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी महाविद्यालयाची गेल्या दहा वर्षाची उपक्रमांची भरारी, महाविद्यालयाने मिळविलेली नवीन कोर्स, अनुदान, नवीन शाखा, स्वच्छ व सुंदर महाविद्यालय म्हणून परिसरात महाविद्यालयाचा नावलौकिक झालेला आहे . या निमित्ताने इतर महाविद्यालय आमच्या महाविद्यालयास भेट देण्यासाठी एकदिवसीय सहल घेऊन येत असतात. संस्थेने महाविद्यालय सुरू केले , म्हणून आज मुली उच्च शिक्षणामध्ये चांगल्या शिकू लागले आहेत. संस्थेची ही यशस्वी वाटचाल तुम्ही सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वी होऊन पूर्ण करून दाखवलेली आहे , असे यावेळी त्यांनी अधोरेखित केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य कार्यकारिणी सदस्य सुरेश खोसे पाटील , राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष दत्ता घाडगे, दैनिक पारनेर समर्थ च्या कार्यकारी संपादिका सौ . निलम खोसे पाटील , माजी प्राचार्य रामचंद्र सुपेकर , पत्रकार अनिल चौधरी, पत्रकार दिपक वरखडे , विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे परीक्षण करण्यासाठी अळकुटी महाविद्यालयाचे प्रा. विशाल रोकडे, प्रा. पोपट सुंबरे, डॉ. प्रवीण जाधव आणि इतर मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रम प्रसंगी गतवर्षीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रमुख मान्यवरांच्य हस्ते गौरव करण्यात आला.

सहकार्याध्यक्ष, प्रा. सचिन निघुट, सांस्कृतिक अधिकारी, प्रा. अश्विनी सुपेकर यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.मनोहर एरंडे यांनी केले. मुख्य कार्यक्रम व समारोप या सत्राचे सूत्रसंचालन प्रा.आनंद पाटेकर, डॉ. मनीषा गाडीलकर, प्रा. नीलिमा घुले, प्रा. संगीता मांडगे यांनी केले. तर आभार कार्यक्रमाच्या कार्याध्यक्ष, डॉ. दुर्गा रायकर यांनी मानले. स्नेहसंमेलन कार्यक्रमासाठी समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, प्राध्यापक, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेह संमेलनात विविध संगीत द्वारे गीते , नकला , सामाजिक संदेशा द्वारे सादर करून उपस्थितांचे मनोरंजन करून कार्यक्रमाला शोभा आणल्याने सर्वांनी आनंदाने कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

# 'महामाता रमाईची लेक' पुरस्काराने डॉ. कविता वरे सन्मानित



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ७ फेब्रुवारी २०२५ रोजी कोकण प्रांत हा अस्पृश्यांच्या समता आणि स्वातंत्र्याच्या लढ्याचे उगमस्थान असून, महात्मा जोतिबा फुले यांच्या काळापासून अनेक नेत्यांनी या भागात सामाजिक समतेचा पाया रचला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली या संघर्षाला यश मिळाले आणि समतेचा सुवर्णकळस बसविला गेला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संपूर्ण जीवनभर साथ देणाऱ्या, कष्ट, त्याग आणि समर्पणाचे प्रतीक असलेल्या *महामाता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'कोकण रिपब्लिकन सामाजिक संस्था' तर्फे 'महामाता रमाईची लेक गुणगौरव पुरस्कार २०२५' आदिवासी समाज व वंचित घटकातील स्त्रियांसाठी करत असलेल्या कार्याबद्दल ग्रामपंचायत किसळच्या सरपंच डॉ कविता वरे यांना कोकणातील अनेक मान्यवर अतिथींच्या साक्षीने आणि सदहस्ते दिनांक ७ फेब्रुवारी, २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वडिलांच्या गावी आंबडवे येथे प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्विकारताना डॉ कविता वरे यांनी भारतीय संविधानाची मुलभूत तत्त्वे जपण्याची गरज, सामाजिक समतेचे महत्व आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याची आवश्यकता आहे असे विषद करून त्यागमूर्ती महामाता रमाई यांचे महत्व सांगितले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात एकाच छत्राखाली

# शासनाच्या विविध सेवा देण्यासंबंधीचा शुभारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : सामान्य प्रशासन विभागाच्या दि.13 जानेवारी 2025 च्या शासन निर्णयान्वये क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी 100 दिवसांसाठी 7 कलमी कृती आराखडा दिला असून त्यात मुद्दा क्रमांक 2 मध्ये नागरिकांना दैनंदिन जीवन सुकर व्हावे, याकरिता सातत्याने प्रयत्न करावेत, असे




नमूद आहे.

त्यानुषंगाने नागरिकांना दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या सेवा त्यांना एक छताखाली उपलब्ध करुन देण्यासाठी दि.9 फेब्रुवारी 2025 पासून एकाच छत्राखाली विविध सेवा देण्यासंबंधीचा शुभारंभ करण्यात आला. या मोहिमेंतर्गत शासनाच्या विविध विभागांमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा व प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता नागरिकांना एकाच ठिकाणी अर्ज करणे व दाखला प्राप्त करणे शक्य होणार आहे. या सर्व सेवा शासनमान्य आधारकेंद्र, कॉमन सर्व्हिस सेंटर, आपले सरकार सेवा केंद्र येथे नागरिकांकरिता उपलब्ध असणार आहेत. (संबंधित केंद्रांची यादी सोबत जोडली आहे).

तरी, जिल्ह्यातील गरजूंनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, तहसिलदार संदीप थोरात यांनी केले आहे.

# मिरकरवाडा मत्स्यबंदर प्रकल्प आढावा बैठक संपन्न

मुंबई : रत्नागिरी जिल्ह्यात मिरकवाडा मत्स्यबंदर प्रकल्प रोजगारनिर्मिती वाढविण्यासाठी महत्वाचा ठरणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यावर मासेमारीसाठी पायाभूत सोयी सुविधांचा विकास होवून मत्स्यउत्पादन वाढणार आहे. मिरकरवाडा रत्नागिरी जिल्ह्याच्या विकासात 'मैलाचा दगड' ठरणारा आहे. या प्रकल्पाचे काम विहीत कालावधीत गतीने पूर्ण करण्यात यावे, असे निर्देश मत्सव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.

मंत्रालयात आयोजित बैठकीत मिरकरवाडा मत्स्यबंदर प्रकल्पाचा आढावा मंत्री राणे यांनी घेतला. बैठकीला मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे, सहआयुक्त महेश देवरे, मिरकरवाडा प्रकल्पाचे मत्स्य विकास अधिकारी श्रीमती अक्षया मयेकर, कोकण प्रादेशिक मत्स्य उप आयुक्त नागनाथ भादुले आदी उपस्थित होते.प्रकल्पाच्या टप्पा क्रमांक दोनमधील कामांचा प्राधान्यक्रम ठरविण्याच्या सूचना देत मंत्री राणे म्हणाले, प्रकल्पाअंतर्गत संरक्षक भिंतीचे काम हाती घेण्यात यावे. निविदा स्तरावरील कामे कशाप्रकारे लवकर सुरू होतील, याबाबत नियोजन करावे. पावसाळयापूर्वी प्रकल्पाची कामे पूर्ण झाली पाहिजेत. कुठल्याही परिस्थितीत विलंब होता कामा नये. पावसाळयात कामे करता येणार नाही. त्यामुळे सूक्ष्म नियोजन करून कामे सुरू करावीत. या कामांना आवश्यक असणाऱ्या परवानग्यांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात यावा. परवानग्या मिळविण्याची कार्यवाही पुढील 15 दिवसांत पूर्ण करावी.मिरकरवाडा मत्स्यबंदर प्रकल्पातील टप्पा दोनमधील पश्चिमेकडील लाटरोधक भिंतीची लांबी वाढविणे, उत्तरेकडे लाटरोधक भिंत बांधणे, नौकानयन मार्गातील गाळ काढणे, भराव व सपाटीकरण, लिलावगृह, जाळी विणण्यासाठी दोन शेड, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे, मच्छिमारांसाठी दोन निवारा शेड बांधणे, पुर्वेकडील ब्रेकवॉटर निष्कासित करणे, अस्तित्वातील धक्का व जेट्टीदुरूस्ती आदी कामे प्रस्तावित आहेत. टप्पा दोन अंतर्गत एकूण कामे 22 असून 3 कामे पूर्ण झाली आहेत, अशी माहिती बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024